
ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-11

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-11 May- June 2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-June Volume-2 Issue-11*

*On*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
**Secretary**
**Young Researcher Association, Kolhapur (M.S), India**

**Editor**
**Dr. R.R.Jane**
**Principal**
**Arts and Commerce College,**
**Bhisi Tah- Chimur Dist-Chandrapur**

**Co- Editor**
**Dr. N.S. Girde**
**Assistant Professor & Head Dept. of History**

*Published by- Young Researcher Association, Kolhapur (M.S), India*

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**

**Peer Reviewed Bi-Monthly**

**ISSN - 2347-7075**
**Impact Factor -7.328**
**Vol.2 Issue. 11 May-June 2022**

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | महिला सक्षमीकरण<br>**डॉ. संगीता भालचंद्र [illegible]** | 1-3 |
| 2 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. अर्चना दयाराम [illegible]** | 4-6 |
| 3 | स्वातंत्रोत्तर काळातील महिला सक्षमीकरणात स्त्री मुक्ती चळवळीतील स्त्रिवादी प्रवाह<br>**डॉ. विजय शंकरराव [illegible]** | 7-8 |
| 4 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**डॉ. मधुकर वि. नंदनवार** | 9-11 |
| 5 | महिलाओं की शैक्षिक-उन्नति में सावित्रीबाई फूले का योगदान:<br>**डॉ. बृजेन्द्र सिंह बौद्ध** | 12-15 |
| 6 | आधुनिक युग में लैंगिक समानता (Gender Equality in Modern Age)<br>**डॉ. फतेह सिंह** | 16-18 |
| 7 | भारतातील अन्नप्रक्रिया उद्योगातील योजनांमुळे महिलांसाठी विस्तारणाऱ्या प्रगतीच्या वाटा<br>**प्रा.सोनल वसंतराव धानापुने** | 19-20 |
| 8 | महिला सबलीकरण आणि शासनाच्या योजना<br>**प्रा. जगताप शालन धर्मराज** | 21-23 |
| 9 | महिला सबलीकरण आाणि शासनाचे योजना – एक अभ्यास<br>**डॉ.चेतना दत्तात्रय जगताप** | 24-26 |
| 10 | भारतीय स्वतंत्रता संग्राम में महिलाओं का योगदान<br>**चन्द्रशेखर उसरेठे** | 27-28 |
| 11 | भारतातील महिला आणि त्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण सद्य:स्थिती<br>**सहा.प्रा.सुदेवाड एस.व्ही.** | 29-30 |
| 12 | महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना<br>**प्रा.डॉ कार्तिक पोळ** | 31-33 |
| 13 | भारतीय अर्थव्यवस्थेत महिला सक्षमीकरण<br>**प्रा.डॉ.विठ्ठल निळकंठ ठावरी** | 34-36 |
| 14 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा.डॉ. मुट्ठे पी. आर., जाधव रामेश्वर दत्तराम** | 37-39 |
| 15 | महिला सक्षमीकरणात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान<br>**डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर** | 40-42 |
| 16 | आधुनिक काळात ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा. डा. विशाल ड्ब्लु. मालेकार** | 43-46 |
| 17 | भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थितीचे अध्ययन<br>**डॉ. अशोक तुकाराम खोब्रागडे** | 47-49 |
| 18 | आधुनिक काळातील महिलांचे क्रिडा क्षेत्रातील सक्षमीकरण<br>**प्रा.डॉ.ईश्वर रंदये** | 50-52 |
| 19 | वैश्वीकरण की तहत में महिलाओं की स्थिति : हिन्दी उपन्यास के विशेष संदर्भ में<br>**डॉ . जिन्सी जोसफ** | 53-54 |
| 20 | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमा<br>**प्रदिप केशव चापले, डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर** | 55-57 |
| 21 | महिला सशक्तिकरण में मानवाधिकारों की भूमिका : एक सोच<br>**Mrs. Swapna V. Tayde, Mrs. Kanchan B. Awasthi, Mrs. Ujwala P. Kaware, Miss. Kavita C. Roy** | 58-60 |
| 22 | शिक्षा पर महिलाओं की अधिकारिता।<br>**शुभांगी मिर्गे, विद्या उम्बरकर, अलका वानखड़े, शुभांगी पाली, क्षमा सराफ** | 61-63 |
| 23 | आधुनिक काळातील सुशिक्षित महिलांचे सक्षमीकरण<br>**सुभाष आर. गोंडाणे** | 64-65 |

**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**
**Peer Reviewed Bi-Monthly**
**ISSN – 2347-7075**
**Impact Factor –7.328**
**Vol.2 Issue.11 May-June 2022**

# आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण

**डॉ. मधुकर वि. नंदनवार**
*सहयोगी प्राध्यापक, भिवापूर महाविद्यालय भिवापूर. जि. नागपूर,*
*email- mnandanwar30@yahoo.com*

**सारांश:**

मानव हा एक समाजशील प्राणी असून तो बुद्धिमान व विचारशील प्राणी आहे. यामुळे मानव आपले मानवी जीवन जगताना तसेच स्वतःचे अस्तित्व व भूमिका पार पाडताना त्याला काही अधिकार व कर्तव्य पार पाडावी लागतात. भारतीय संविधानात मुलभूत हक्कांचा समावेश केला असून मानव कोणत्या देशाचा, वंशाचा, लिंगाचा किंवा त्याचे सामाजिक,आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक स्थान कोणते याचा विचार न करता त्यात काही मूलभूत अधिकार दिले आहेत. स्त्री-पुरुष अधिकाराची संकल्पना ही न्याय, स्वातंत्र्य , समानता, लोकशाही आणि मानवी प्रतिष्ठा या संकल्पाशी संबधित आहे. भारतीत स्त्रियांची संख्या पुरूषांच्या बरोबरीने आहे. आधुनिक काळात महिलांच्या तुलनेत ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण झालेले दिसत नाही. या ग्रामीण महिलांचे एकूनच सक्षमीकरण करणे आज काळाची गरज बनली आहे. 10 डिसेंबर 1948 हा दिवस 'मानवी हक्क दिवस' म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने साजरा करण्याचे ठरविले. मानवाच्या विविध कार्याच्या अंमलबजावणीसाठी मानवी हक्काचे राष्ट्रीय मंडळ (एन.एच.आर.सी.) स्त्रियांसाठी राष्ट्रीय मंडळ, युनायटेड नेशन्स, राष्ट्राचे मानवी हक्कावरील मंडळ यांच्या कार्याचा समावेश केला आहे. 1975 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषीत केले. तेव्हापासून 1975 ते 1985 च्या दशकात सर्वप्रथम स्त्रियांना केंद्रस्थानी ठेऊन महिलांचा एक व्यक्ती व समाजाचा घटक म्हणून जगात विचार सुरु झाला. पुढे 8 मार्च हा 'जागतिक महिला दिन' साजरा करण्याचे सर्वमान्य होत गेले. 2001 हे सरकारने महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. असे असले तरी भारतातील ग्रामीण भगातील स्त्रियाचे पूर्णपणे सक्षमीकरण झालेले आहे असे म्हणता येत नाही. आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विषेशतः जागतिकीकरणाच्या लाटेत स्त्रियांचे महत्व आज जगाला स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात सिध्द करून दाखविले आहे. त्यासंबंधाने आधुनिक काळात विषेशतः ग्रामीण महिलांचे सक्षमीकरणाचा थोडक्यात घेतलेला आढावा.

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून चालत आलेल्या भारतीय संस्कृतीने कित्येकांचा आघात होऊनही आपला परंपरागत वारसा जपला आहे. मानव समाजशील प्राणी असून तो बुध्दीजिवी प्राणी आहे. तो आपले कौटुंबिक जीवन जगताना स्वतःचे अस्तित्व व आपली सामाजिक भूमिका पार पाडताना दिसतो. समाज व्यवस्थेत वावरत असताना या देशातील आपली सामाजिक रचना, त्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या रूढी,परंपरा, चालीरिती, बुरसटलेली माणसिकता यांचा विचार करताना स्त्रिया या पूर्वीपासून आजही सुरक्षित असताना दिसत नाही. महिलांवरील अत्याचार पूर्वीपासून आजही होतांना दिसत आहेत. राष्ट्रविकासात स्त्रियांचे स्थान महत्वपूर्ण असूनही स्त्रियांना उपेक्षित जीवन जगावे लागत आहे. 'महिला म्हणजे एक दासी, महिला म्हणजे 'चूल आणि मूल अशा हिन भावनेच्या भूमिकेतून स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कित्येक वर्षे चालत होता. वर्षानूवर्षापासून स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी दुय्यम स्वरुपाची आहे. महिला किंवा स्त्री एक भोगवस्तू आहे तिला पुरुषापेक्षा दुय्यम स्थान आहे म्हणून समाजव्यवस्थेने तिच्याकडे आजतागायत बघितले असल्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार होत आहेत. याला कारणीभूत समाजव्यवस्था व शासनव्यवस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. 1950-70 च्या कालखंडात महिलांकडे केवळ मदतकार्य या भावनेतून विविध संघटनेकडून व शासकीय यंत्रणेकडून महिलांकरिता कार्यक्रम आखले जायचे. स्त्री ही केवळ एक माता व पत्नी हाच स्त्रियांचा दर्जा होता. भारतीय समाज व्यवस्थेमुळे भारतात स्त्रियांना नेहमीच गौण स्थान देण्यात आले होते. इतिहासाचा आढावा घेतल्यास वैदिक काळात काही अपवाद सोडल्यास सर्वच काळात स्त्रियांची मानहानी व स्त्रियांवर अत्याचार झाल्याचे दिसून येते. आजच्या आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळातही स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार कमी झालेले दिसत नाही. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण होणे महत्वाचे आहे.

**महिला सक्षमीकरण संकल्पना:**

स्त्री सक्षमीकरण म्हणजे, कायद्याच्या पातळीवर महिलांना पुरूषासारखे समान अधिकार असणे म्हणजे महिला सक्षमीकरण असे म्हटल्या जाते. स्त्रीच्या बुद्धिमत्तेला, सुप्त शक्तीला किंवा कार्यक्षमतांना, सामर्थ्याला, धारणक्षमतेला फुलविणे, तसेच स्वतःची खरी ओळख, विचारस्वातंत्र्य, आभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रत्यक्ष कृती, तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय. स्त्रियांना केवळ त्यांच्या क्षमतेची जाणीव करून न देता,त्यासोबतच, त्यांना आवश्यक त्या संधी, सुविधा आणि बाहय व आंतरिक वातावरण निर्माण करून देणे, त्यांच्या जन्मजात गुणांचा यथायोग्य वापर करून, त्यांच्यात आत्मवि स्वास आत्मनिर्थरता निर्माण करून देणे, हे स्त्री सक्षमीकरणासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. तिच्याविरूदध होणाऱ्या अन्याय व शोषणाविरूद्ध आवाज उठविणे व त्याविरूद्ध संघर्ष निर्माण करण्याची क्षमता तिच्यात निर्माण करणे, म्हणजे स्त्रीचे सक्षमीकरण करणे होय. एकूणच स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी स्त्रीला आर्थिक, सामाजिक,नैतिक, सांस्कृतिक दृष्टीने सुदृढ करणे होय. त्यासाठी महिला आरक्षण धोरणाचा स्वीकार करण्यात आला.

**महिला सबलीकरण व मानवी अधिकार:**

भारतात पुरूष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांना समजात दुय्यम स्थान निर्माण करून त्यांना चूल आणि मूल यात गोवण्यात आले. यामुळे त्यांचा विकास झालेला नाही. ग्रामीण स्त्रीयांत याची गंभीरता आजही दिसते. पर्यायाने राष्ट्र विकासात महत्वाची भूमीका बजावण्यात आलेली नाही. समाजात अर्धा वाटा असणारया महिलांच्या विकासाशिवाय मानव जातीचा 100टक्के विकास होऊ शकत नाही. त्यासाठी महिला सक्षमीकरणाची संकल्पना पुढे

आली. महिला सक्षमीकरणात महिलांची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय दास्यातून मुक्ती करून पुरुषाच्या बरोबरीने स्थान प्राप्त करून देणे होय. महिला सक्षमीकरणाचे कार्ये महात्मा फुले यांच्या काळापासून सूरू झाले. बालमनावर पहिले संस्कार माताच करू शकते हा सिध्दांत अनेक सुधारकांना पटल्यामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात क्रांतीकारी बदल घडविण्याचे कार्य राजा राममोहन रॉय, महर्षी कर्वे, आगरकर सावित्रीबाई फुले, ॲनी बेझंट, कर्मविर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणाच्या चळवळीचे महत्वपूर्ण कार्ये केले व स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्री सक्षमीकरणात महत्वाचे योगदान दिले. आजच्या काळात जागृत झालेली स्त्री समाजात मोठ्या आत्मविश्वासाने वावरत असून आपले हक्क व अधिकारासाठी सक्षमपणे उभी आहे.

**महिला सक्षमीकरण वियक कायदे:**

स्वातंत्र्यानंतर महिलांच्या विकासासाठी व महिला सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी योजना व विकासात्मक कार्यक्रम राबविले गेल्याचे दिसते. महिलांना त्यांच्या अधिकाराची जाणीव व्हावी व त्या आर्थिक, सामाजिक दृष्टीकोणतून आत्मनिर्भर व स्वावलंबी जीवन जगता यावे म्हणून त्यांच्यात प्रेरणा निर्माण केल्या गेल्या त्यासाठी काही महत्वाचे कायदे करण्यात आले. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला मानवाधिकार उपयुक्त ठरला. या कायदयात- प्रसुती सुविधा कायदा 1961, बालविवाह निषेध कायदा 1976, स्त्री अनिष्ट निरुपण निषेध कायदा1986, वे श्यावृत्ती निवारण कायदा 1986, हुंडा निषेध कायदा 1986, सती निषेध कायदा 1987, समान वेतन कायदा 1976, घरघुती हिसेंपासून महिला संरक्षण कायदा 2005, हिंदू वारसा कायदा 2005, विवाह नोंदणी कायदा, मेंटेनन्स ॲंड वेलफेअर ऑफ पॅरेंट्स ॲंड सिनिअर सिटिझनबील 2006 व घरेलू कामगार विधेयक 2008 अ शा कादयामुळे स्त्रीयांना आपले अधिकार मागता येऊ लागले, या कायदयांमुळे मोठे पाठबळ स्त्रियांना प्राप्त होऊन महिला सक्षमीकरणास गती मिळाली.

भारतात 1950 पासून लोकशाही शासनपद्धती अमलात आली. लोकशाही शासन व्यवस्थतेत स्त्रीयांचा सहभाग महत्वाचा ठरला. भारतातील राजकारणात महिलांचा सहभाग विचारात घेतल्यास असे दिसते की, सन 1952 ते 1999 च्या दरम्यान भारतात लोकसंख्येच्या एकून सदस्य संख्येत महिला प्रतिनिधिचे प्रमाण 6 ते 7 टक्के आहे. तर राज्यसभेत हेच प्रमाण 9 ते 10टक्के एवढे आहे. म्हणजेच संसद ही देशातील सर्वाचे सत्ताकेंद्र असून जेथे देशाच्या विकासाचे निर्णय घेतले जातात तेथे महिलांचे प्रमाण फारच कमी असल्याचे जानवते. भारतातील राज्य विधिमंडळातील महिला सदस्यांचे प्रमाणही 4 टक्के एवढेचच आहे. असे असले तरी स्त्री सक्षमीकरणाला राजकीय वलय प्राप्त झाले हे निश्चितच खरे आहे.

**भारतातील स्त्री सक्षमीकरण:**

भारतीय संविधानानुसार 73 व 74 संधनाद्वारा महिलांना 33 टक्के आरक्षण हे महिलांच्या सक्षमीकरणातील महत्वाचे पाऊल होय. या संशोधनानूसार महिलांना राजकीय क्षेत्रात निवडणूक लढविण्याकरिता एक महत्वपूर्ण अधिकार प्राप्त झाला. हे आरक्षण व अधिकार मिळाल्याने ग्रामीण महिला अधिकाधिक संख्येने ग्रामपंचायत निवडणूकीत विजयी झाल्या आहेत.

भारतातील जिल्हा स्तरावरील किंवा स्थानिक पातळीवरील विकासाचे सत्ताकेंद्र म्हणजे पंचायत राज संस्था होय. पंचायत राज संस्थामधील अखिल भारतीय स्तरावरील महिलांचे सरासरी प्रमाण जिल्हा परिषदेत 32 टक्के तर पंचायत समितीत 22 टक्के तर ग्रामपंचायतमध्ये 31 टक्के असे आहे. राजकीय क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या तुलनेत अधिकाराचा समान वाटा दिसून येत नाही. महिलांच्या वाढत्या राजकीय सहभागामुळे व अनुभवामुळे महिलांच्या सशक्तीकरणचा मार्ग प्रशस्त झाला आहे असे म्हणता येईल.

ग्रामीण स्तर-महाराष्ट्रातील ग्रामपंचायतमधील एकून सभासद संख्या 303545 एवढी असून त्यापैकी 101182 महिला ग्रापंचायत सदस्य बनल्या.पंचायत समिती सदस्य 1147 झाल्या आणि जिल्हा परिद सदस्य 587 निवडून आल्या. या आकडेवारीवरुन संविधान संशोधना व्दारे महिलांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदांमध्येच सहभाग नाही तर नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. यावरून ग्रामीण महिलांचे राजकीय क्षेत्रातील सक्षमीकरण झाल्याचे निश्चितच उल्लेखनिय आहे.

संविधानाने बहाल केलेल्या आरक्षणामुळे महिलांचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक परिस्थितीत महत्वाचा बदल झालेला आहे. आज महिला स्वयंस्फूर्तीने व सक्तपणे निवडणूक प्रचारामध्ये सहभाग घेत आहेत. महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात महिलांची राजकीय सहभागाची आवड निर्माण व प्रगल्भता दिसून येते. याचा परिणाम 1991 च्या लोकसभा निवडणूकामध्ये माहितीच्या अधिकाराव्दारे दिल्या गेलेल्या मतदानाची टक्केवारी 51.4 दिली गेली.1996च्या निवडणुकीत 53.4 टक्के तर 1998 च्या निवडणूकीत ती 57.9 टक्के झाली.यावरून असे स्पष्ट होते की, मागील वीस वर्षातील महिलांच्या वाढत्या राजकीय सहभागामुळे व अनुभवामुळे सशक्तीकरणाचा मार्ग प्रशस्त झाला असून महिलाचे सक्षमीकरण झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील महिलांना 11 एप्रिल 2011 साली 50 टक्के आरक्षण दिल्या गेले आणि महिलांचा राजकारणातील सहभाग व संधी याकडे लक्ष वेधून अधिकाधिक महिलांना राजकारणात सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. भारतातील ग्रामीण महिला अधिक सक्षम होण्याच्या अनुशंगाने महिलांचे राजकीय योगदान महत्वाचे आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा राजकीय सहभाग, राजकीय संघटनांची सदस्यता वाढविण्याकरिता प्रयत्न व्हावेत. त्याचा राजकारणावर चांगला परिणाम पडेल. लोकांचा परिचय व जनसंपर्क वाढेल या सर्व घटनांमुळे त्याचा गुणात्मक स्तर वाढेल. महिलांना नेतृत्व करण्याची क्षमता वाढेल. व त्या निश्चितच सर्वगुणसंपन्न होतील. महिलांचा राजकीय क्षेतातील प्रवेश म्हणजे राजकारणाचे आधूनिकीकरण व महिलांचे सक्षमीकरण होय. याचाच एक भाग म्हणजे महिलांना मिळालेल्या अधिकरामुळे महिलांनी दे शाच्या राष्ट्रपती पदापर्यंतची भूमीका पार पाडली आहे.

**स्त्री सक्षमीकरणासाठी जागतीक पातळीवरचे प्रयत्न:-** जगात दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न सुरू झाले. युनोच्या स्थापनेनंतर त्याला चांगली चालना मिळाली. यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्वाचे उपाय सुचविण्यात आले.

1. **मानवी अधिकाराच्या जाहीरनाम्यात समावेश**- 10 डिसेंबर 1948 ला संयुक्त राष्ट्रसंघाने जाहिर केलेल्या मानवी हक्क जाहिरनाम्यात महिला हक्कांचाही समावेश केला गेला. कलम 23 मध्ये समान कामासाठी समान वेतन देण्याची तरतूद केली. स्त्री पुरूषाप्रमाणे धर्म किंवा लिंग या घटकावरून भेद केल्या जाणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले.
2. **महिला सक्षमीकरण वर्षे 2001**-2001 हे वर्ष सरकारने महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. 8 मार्च हा महिला दिवस म्हणून साजरा केल्या जातो.
3. **लिंग भेदावर आधारीत भेदभाव नष्ट करण्याचा ठराव 1979**- गेल्या अनेक वर्षांपासून स्त्रियांचे शोषण होत आहे ते थांबविण्यासाठी हा ठराव 1979 पास करून पुरूषाच्या बरोबरीने अधिकार मिळावे म्हणून या ठरावात तरतूदी करण्यात आल्या.
4. **राजकीय ठराव**:- राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा या दृष्टीने 1952 मध्ये युनोने पुरूषाप्रमाणे स्त्रीयांनाही राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा ठराव मंजूर केला. त्यात मतदान करणे व निवडणूक लढविणे हे अधिकार मान्य केले.
5. **आंतरराष्ट्रीय महिला आयोग**:- महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी ही संस्था कार्य करते ही संस्था महिला संदर्भात आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करते.

**परिणाम**:

भारतातील केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विकासाच्या व कल्याणाच्या विविध योजना राबवित आहेत. तरी महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट अजूनही पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळविण्यासाठी अजूनही बराच कालावधी लागेल असे दिसते. लिंग समानतेचा कितीही आव आणला तरी ती साध्य होईल यासारखी परिस्थिती भारतात नाही. याचे कारण असे आहे की, स्त्रीयांच्या विषयी ग्रामीण समाजाच्या मानसिकतेत फारसा बदल झाला असे वाटत नाही. भारतीय समाज 21 व्या तकात वावरत असला तरी स्त्रीयांच्या प्रश्नाकडे पाहतांना तो सतराव्या अठराव्या शकातील वर्तन ठेवतो. त्यामुळे स्त्रियांना समान हक्क देण्याच्या बाबतीत सहसा तयार होईल असे वाटत नाही.

भारतात सर्वच भागातील सर्वसामान्य लोकचं स्त्रियांच्या प्रश्नाकडे अनास्थेने पाहतात असे नाही तर विचारवंत किंवा समाजसुधारक आणि राजकीय पुढारी देखील स्त्रियांच्या प्रष्नांकडे अनास्थेने बघतात व कृती करतात. भारतीय संसदेत व राज्य विधीमंडळात महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचे प्रश्नाबाबत चालविलेली चालढकल हे त्यांचे उत्तम उदाहरण होय. त्यासाठी आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आवश्यक वाटते.

**स्त्री सक्षमीकरणासाठी उपाययोजना**:

स्त्री सक्षमीकरणासाठी महत्वाच्या उपाययोजना आवश्यक असल्याचे दिसते. यात स्त्री शिक्षणाचे साक्षरतेचे प्रमाण वाढविणे, स्त्रियांना आर्थिकदृष्ट या स्वावलंबी बनविणे, पुरुषांप्रमाणे स्त्रियांनासुद्धा वि शेष निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे, आर्थिक व्यवहार व संपत्तीमध्ये स्त्रियांना अधिकार देणे, राजकारणात स्त्रियांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व देणे, प्रशासनामध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढविणे,स्त्रियांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करुन देणे पुरुषप्रधान विचारसरणी व मानसिकतेमध्ये बदल घडवून आणने, विविध विकास योजना व कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये महिलांना प्राधान्य देणे महत्वाचे वाटते यासोबतच महिलांच्या उन्नतीसाठी सकारात्मक उपायाची गरज वाटते. त्यात-कायद्याची अंमलबजावणी कडकपणे केली जावी. महिलांचा सन्मानाची वागणूक मिळणारे लेखन वृत्तपत्रे व पुस्तकातून प्रसिद्ध करण्यात यावे. महिलांचा ती ज्याठिकाणी नोकरी अथवा काम करते ते ठिकाण सुरक्षित असावे व तिचा लेंगिक छळ होणार नाही अशी परिस्थिती निर्माण करावी. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये महिलांचे अधिकार व मानवी हक्क याबद्दलची माहिती देणरे लेख प्रकाशीत करण्यात यावेत. स्त्रीयांचे मानवी हक्क व लैंगिक हक्क याबद्दल सर्वत्र जागृती करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:**

भारतात महिलांना घटनेतील तरतूदीनुसार जे मानवाधिकार प्राप्त झाले आहेत त्यामुळे तिच्या सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक ,राजकीय क्षेत्रात बदल घडून आलेला दिसतो. प्राचीन काळापासून तर स्वातंत्र्योत्तर काळापेक्षा स्त्रियांचा आजचा दर्जा व स्थिती चांगली आहे असे दिसून येते. परंतु आजही बहुतांश स्वातंत्र्योत्तर भारतीय महिला येथील पुरूषांच्या तुलनेत प्रत्येक क्षेत्रात उपेक्षित असून त्यांची प्रतिष्ठा व समान दर्जा अजूनही जपल्या जात नसल्याचे दिसून येते. घटनेतील तरतुदीनुसार भारतीय महिलांना मानवाधिकार प्राप्त झाले आहे. परंतु प्रत्यक्षात समाजातील त्यांची स्थिती दुय्यम वर्गातील नागरिकाप्रमाणे आहे असे दिसते. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी सर्वकस प्रयत्न केले आहेत. त्यातून स्त्रियांच्या स्थितीत काही प्रमाणात बदल झाले आहेत. परंतु भारतीय समाजात स्त्रियांना एक आदरयुक्त दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. महिलांच्या दर्जात सुधारणा करण्यासठी कायदे व कार्यक्रम तेव्हाच महत्वपूर्ण ठरतील जेव्हापर्यंत आपण समाजाचा स्त्रियांच्या बाबतीत असणारा पारंपरिक दृष्टीकोन बदलविणार नाही तोपर्यंत स्त्री सक्षमीकरण झाले असे म्हणने उचित होणार नाही.

**संदर्भ :**

1) मेहेत्रे, डॉ. स्मीता, ‘भारतीय स्त्री व मानवाधिकार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2011
2) डॉ. उज्वला वैरागडे/ प्रा. विद्युल्लता मुळे, सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण,विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, दु.आ. 2012
3) पाटील, प्रा. व्ही.व्ही., ‘मानवी हक्क, के. सागर पब्लीकेशन, नई दिल्ली, 2005
4) डॉ. अलका देशमुख, विविध आयामातून स्त्री, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2011
5) योजना मासिक- मे 2007
6) बहिःस्कृत भारतरतील अग्रलेख- रत्नाकर गणवीर.

Young Researcher Association

# INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH

## CERTIFICATE

Is hereby awarding this certificate to

**NAME-**

In recognition of the publication of the paper entitled

**TITLE-**

Published in **INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE & APPLIED RESEARCH (IJAAR). ISSN 2347-7075. IMPACT FACTOR** 7.328

**VOLUME -** **ISSUE-** **DATE-** **2022**

**Dr. Pravin Talekar**
***Executive Editor***